Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- V MAY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# ख्रिस्ती मिशनऱ्यांनी जगाला दिलेल्या देणग्या

**विश्वास गोरखनाथ वळवी ( संशोधक विद्यार्थी )**
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव ( महाराष्ट्र )
ईमेल:-vishwasvalvi1986@gmail.com

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी या विश्वाला अनेक देणग्या दिल्या आहेत. विशेषतः विकसनशील राष्ट्रांना, आफ्रिका आणि आशिया खंडातील देश हे गरीब असून शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक दर्जापासून वंचित असे होते. इ.सन १६०० ते २० व्या शतकापर्यंत फ्रेंच, डच, पोर्तुगीज, ब्रिटिश इत्यादी सत्तांनी या राष्ट्रांची आर्थिक पिळवणूक केली आणि त्यामुळे त्या देशातील भौतिक साधनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणात हरण झाले. आफ्रिका खंडात कामगारांच्या कामातून ९३% पैसे कपात होत होते आणि त्यांना कामाचे फक्त ७% पैसे मिळत असे. अशा परिस्थितीत ख्रिस्ती मिशनऱ्यांनी विश्वाच्या वेगवेगळ्या कोणात जाऊन ख्रिस्ताचा संदेश प्रचार करण्याबरोबरच लोकांना सामाजिक दर्जा प्राप्त करून देण्यासाठी त्यांना शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या.

''मिशन म्हणजे देवाचे राज्य आणि या राज्याला महान आज्ञेसोबत घेऊन चालणारा मिशनरी''१. मिशनरी हा एक प्रकारचा संदेशवाहक असतो. ख्रिस्ताच्या शिक्षणावर तो स्वतः आपले जीवन पावन करून इतरांना त्याचे शिक्षण देतो.

मिशन शब्दाची उत्पत्ती ही लॅटिन शब्दापासून झालेली असून त्याचा अर्थ 'पवित्रशास्त्राच्या माध्यमातून ख्रिस्ताने दिलेली सेवा' असा होतो.

आज संपूर्ण विश्वात महान आदेश प्रचार व प्रसार करणाऱ्या ख्रिस्ती मिशनरी यांच्या डोळ्यापुढे ख्रिस्ताने सांगितलेले प्रेरणादायी शब्द म्हणजे "यास्तव तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांना शिष्य करा, बापाच्या, मुलाच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने त्यांना बाप्तिस्मा द्या. ज्या काही गोष्टी मी तुम्हाला आज्ञापिल्या. त्या सर्व पाळायला त्यांना शिकवा आणि पाहा, काळाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे. आमेन."[२] हे शब्द घेऊन ख्रिस्ती मिशनऱ्यांनी संपूर्ण विश्वात ख्रिस्ताचा प्रचार केला आणि फक्त प्रचारच केला नाही तर त्यासोबत पुढील गोष्टी विश्वाला प्रदान केल्या.

## १. शिक्षण

आशिया आणि आफ्रिका खंडात विकसनशील राष्ट्रे आहेत आणि ते शिक्षण आरोग्याच्या दृष्टीने पिछाडलेले होते. ख्रिस्ती मिशनरीचे सर्वात पहिले या लोकांना शिक्षण दिले, त्यांच्यासाठी शाळा, वसतिगृहे यांची स्थापना केली आणि त्यांच्यासाठी स्थानिक भाषेत बायबलचे अनुवाद केले. जेणेकरून त्यांना ख्रिस्ताचे सर्वोच्च प्रकटीकरण प्राप्त व्हावे. भारतात

१८१३ च्या चार्टर एक्टने ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आदिवासी आणि दलित समाजात शिक्षणाचे नवीन प्रयोग सुरु केले. बार्थालोमस, जिगनबाल्ग आणि विल्यम केरी यांनी छपाई यंत्र आणून पवित्र शास्त्राचे अनेक भाषात भाषांतर करून शिक्षणाचे नवे युग सुरू केले.

**२ आरोग्य :**

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आरोग्याच्या दृष्टीने मागास प्रदेशात जाऊन अनेक डिस्पेंसरी काढल्या आणि लोकांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. ख्रिस्ती मिशनरी हे फक्त पाळक, उपदेशक नव्हते तर काही मिशनरी व्यवसायाच्या दृष्टीने डॉक्टर, लेखक आणि शिक्षक देखील होते. त्यामुळे आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात ते आघाडीवर होते. आदिवासी आणि दलित समाज जोपर्यंत आरोग्याच्या दृष्टीने उंचावणार नाही. तोपर्यंत समाज स्थिर होणार नाही. त्यामुळे आफ्रिकेतील निग्रो आणि आशिया खंडातील आदिवासी लोकांसाठी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपले सर्वोत्तम योगदान दिले. ख्रिस्ती मिशनरीकडे एकच उद्देश होता. ख्रिस्ताने योहानाच्या शिष्यांना एकदा म्हटले, "जे तुम्ही ऐकता व पाहता, ते योहानाला जाऊन सांगा. आंधळे पाहतात, पांगळे चालतात, कुष्ठरोगी शुद्ध होतात, बहिरे ऐकतात, मेलेले उठवले जातात व गरीबास सुवार्ता सांगण्यात येते."[३] ख्रिस्ती मिशनऱ्यापुढे हे वचन होते आणि त्याचप्रमाणे मिशनरी फक्त लोकांसाठी प्रार्थनाच करीत नव्हते तर त्यांना आरोग्याच्या भौतिक सुविधाही उपलब्ध करून देत होते. त्यामुळे लोकांची परिस्थिती आरोग्याच्या दृष्टीने पालटली आणि ते पुढे शिक्षण घेऊन शिक्षित होऊ लागले. ख्रिस्ती मिशनरी यांना हे माहित होते आणि आहे. "ज्या देवाने आम्हाला निर्माण केले आहे आणि ज्याच्यामुळे आपण आहोत, त्याच्या काही अपेक्षा आहेत. ज्यांनी आम्हाला निर्माण केले, ज्यांनी आम्हाला सर्व काही दिले आहे आणि परिणामतः त्याला ज्या अपेक्षा आहेत, त्याच्याच पवित्रशास्त्रात आमचे पाचारण असा उल्लेख करण्यात आला आहे. नव्या करारात क्रियापद म्हणून वापरण्यात आलेला ग्रीक शब्द कालेवो असून त्याचे नाव क्लेसिस असे आहे. ग्रीक शब्दकोशातील त्याचा अर्थ १) स्थान किंवा एकाने आपल्या ताब्यात ठेवलेली स्थिती २) एक विशेष हक्क आणि जबाबदारी अनुभवण्यासाठी निमंत्रण तसेच जे स्थान आणि जो विशेष हक्क देवाने आम्हाला त्याची मुले म्हणून दिला आहे. त्याचाच परिणाम म्हणजे निमंत्रण आणि जबाबदारी आणि त्याप्रमाणे आमचे आचरण असले पाहिजे."[४] हे निमंत्रण आणि जबाबदारी एवढ्या प्रामाणिकपणे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी संपूर्ण विश्वात जाऊन लोकांची सेवा करून पार पाडले. देवाशी असलेला प्रामाणिकपणा, सेवा प्रति असलेली आस आणि ख्रिस्ताचा दर्शनावर निरंतर चालणे. यामुळे संपूर्ण विश्वाला ख्रिस्ताची प्रीती, दया आणि ख्रिस्तीपणा मिशनरी दाखवू शकले.

**३ वेगवेगळ्या स्थानिक भाषेत सहित्याची रचना :**

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शिक्षण आणि आरोग्याची साधने उपलब्ध करून दिलीच. पण त्याचप्रमाणे पवित्रशास्त्र आणि त्यावर आधारित ख्रिस्ती पुस्तकांची रचना केली. हे साहित्य वेगवेगळ्या राष्ट्रातील स्थानिक भाषेच्या विकासास कारणीभूत ठरते. एकट्या विल्यम केरी ने भारतात ४० भाषेत साहित्याची निर्मिती केली. भारतीय साहित्यात जेवढी भर आधुनिक ख्रिस्ती लेखकांनी घातली नाही. तेवढी ख्रिस्ती साहित्याची रचना भारतात आलेले ख्रिस्ती मिशनरी करून गेले.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी ख्रिस्ताचा सुवार्ताप्रचार केला. या प्रचारात साहित्य, आरोग्य, शिक्षण या गोष्टींबरोबरच सत्य, प्रीती, दया, सद्सद्विवेक, अहिंसा इत्यादी गोष्टी जागतिक मानवाला प्राप्त झाल्या आणि त्यामुळे कुठेतरी राष्ट्रे ही संपन्न होऊ लागली. विज्ञान, अर्थव्यवस्था, सामाजिक घटकात सुधारणा होऊ लागल्या आणि त्यामुळे आधुनिक विश्वाची निर्मिती होऊ लागली. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी अध्यात्मिक देणग्या देण्याबरोबरच संपूर्ण मानवजातीला भौतिक सुधारणेत नेऊन ठेवण्याचे कार्य केले. समान अधिकारांच्या वाटणीत आणून ठेवले.

**४. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपले वतन, धनसंपत्ती त्यागून दुसऱ्या राष्ट्रासाठी स्वतःला वाहून घेतले:**

हे अविश्वसनीय पण सत्य आहे. असे करण्याची हिंमत आणि प्रेरणा कोठून आली ? ख्रिस्ताच्या प्रीतीतून. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपले सर्व त्यागून आपले सर्वस्व जगाला दिले. उदाहरणार्थ, “बगदादचे प्रथम मिशनरी एंथनी लोरीस ग्रोव्हज आणि त्यांची पत्नी यांनी असे ठरवले होते की, ते या पृथ्वीवर धनसंचय करणार नाहीत आणि त्यांच्या भक्कम मिळकतींचा पूर्ण भाग ते प्रभूच्या सेवेप्रित्यर्थ वाहून देतील. ए टी स्टॅन्ड यांनी आपली सर्व संपत्ती ख्रिस्तास समर्पित करण्याचा निर्णय घेतला. जी संधी त्या धनवान व्यक्तीने गमावली होती. तिचा लाभ उचलण्याचा त्यांनी निर्णय घेतला. परमेश्वराच्या लिखित वचनांचे पालन केल्यावरच हे शक्य होते. लक्षावधी रुपये परमेश्वराच्या सेवेप्रित्यर्थ दान केल्यानंतर त्यांनी ९,५८८ डॉलरची रक्कम आपल्या नवेल्या वधूसाठी राखून ठेवली.”[५] हे शक्य त्यालाच आहे, जो देवाला पूर्ण समर्पित आणि देवाच्या हेतूप्रती प्रामाणिक आहे आणि त्यामुळेच ख्रिस्ती मिशनरी एवढे मोठे कार्य करू शकले. जिम इलीइटच्या शब्दात, “हे पित्या मी निर्मळ बरा, म्हणजे मी या पृथ्वीवरील वस्तूस बिलगून राहू शकणार नाही. माझे जीवन, माझे नाव, माझी संपत्ती ही सारी बंधने मी तोडून देऊ इच्छितो. मी आपल्या सर्व लाडक्या गोष्टी त्यातून देऊ इच्छितो. कित्येकदा मी आपली पकड सैल केली. परंतु अनेकदा माझ्या दृष्टीने ती गोष्ट अनमोल ठरली. एक प्रेमळ साक्षी माझे हात मोकळे कर म्हणजे मी त्या वधस्तंभावरील खिळ्याच्या जखमांचा स्वीकार करू शकतो. सर्वस्व त्यागीत असतानाही स्वतः ओतला जाईल. मला जखडून ठेवणाऱ्या सर्व बंधनांपासून मी स्वतंत्र होईल. यास्तव मी सर्वस्वाचा त्याग करू इच्छितो.”[६] पवित्रशास्त्रात आपण अब्राहमला पाहतो. ज्याने आपले सर्वस्व त्यागुन म्हणजे आपला देश, गोत्र, वंश, परिवार, संपत्ती इत्यादी आणि देवाने त्याला सांगितले त्या देशात तो विश्वासाने निघाला. त्याला माहीत नव्हते की, मी कुठे जात आहे. पण त्याने देवावर विश्वास ठेवला आणि त्यामुळे त्याला धार्मिकतेचा आणि विश्वासाचा पिता असे म्हटले गेले. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी देखील तेच कार्य केले.

मदर तेरेसा तेरा वर्षाच्या असतांना कोलकात्याला आल्या आणि परत कधीही गेलेल्या नाही. आपले संपूर्ण आयुष्य भारतातील गोरगरीब लोकांसाठी वाहून दिले. विल्यम केरी आधुनिक भारताच्या इतिहासाला गती प्राप्त करून देणारा मिशनरी ठरला. संपूर्ण विश्वाचा अनाथ मुलांचा पिता जॉर्ज मुल्लर, शारीरिक मृत्यूच्या छायेत राहून ज्याने बरोबर अनेक लोकांचे आत्मे वाचवले, तो फादर डॅनियल, सत्यावर अटळ राहून ख्रिस्ताचा नकार न देता अग्नीमध्ये स्वतःची आहुती देणारा पॉलीकार्थ, मृत्यूच्या भयावर विजय मिळवून ज्याने धर्मसुधारणा चळवळ घडवून आणली आणि सामान्य लोकांना बायबलच्या योग्य प्रवाहामध्ये आणले, तो मार्टिन

लूथर. "ख्रिस्ती मिशनरी लोकांनी संपूर्ण जग हरवून सोडले. पण मिशनरी चळवळीचा हा प्रवाह कधीही थांबू दिला नाही. आज तुम्ही आम्ही या मिशनऱ्यांच्या पाऊलखुणावर पाऊल ठेवून चालण्याची गरज आहे. हा प्रवाह कधी थांबणार नाही. कारण जे कार्य देव सुरू करतो त्याला कोण रोखू शकतो ? ख्रिस्ताच्या दुसऱ्या आगमनावेळी मिशनरी चळवळींची पावले थांबतील. पण देवाच्या महिमेसाठी ते पुन्हा सज्ज होतील."[७]

अजून कित्येक उदाहरणे द्यायची. इब्रीकरास पत्राचा लेखक म्हणतो, "तर मी आणखी काय सांगू गिदोन, बाराक, शशोन, इफताह, दावीद व शमुवेल व भविष्यवादी यांच्या विषयी विस्ताराने सांगायला मला वेळ पुरणार नाही."[८] ख्रिस्ती मिशनरी यांची संख्या आणि त्यांचे कार्य अगणित असून त्याला एका प्रवाहात बंदिस्त करून ठेवता येणार नाही. त्याचा जोर गेल्या २०२० वर्षात एवढा मोठा आहे की, त्या प्रवाहाला आजपर्यंत कोणताही रोखू शकले नाही.

**५.ख्रिस्ती मिशनरी यांनी जगाला समता, बंधुता आणि समानतेचा अधिकार प्रदान केला :**

ख्रिस्ती मिशनरी भारतात आले आणि त्यांनी समाज सुधारणा घडवून आणल्या. ब्रिटिश आणि मिशनरी ही दुही वेगवेगळी होती. गोऱ्या लोकांचे ओझे फक्त ख्रिस्ती मिशनरीनी राबविले (अपवाद हेन्री मार्टिन, विल्यम जोन्स, फ्रेड्रिक ख्रिश्चन) हे ओझे ख्रिस्ताचा सुवर्तेचे होते. अध्यात्मिक सुधारणा आणि मोक्ष प्राप्तीचे होते. भारतातील भरपूर लोक म्हणतात, गोरे लोक हे स्वतःला श्रेष्ठ आणि महान समजत होते आणि हे खरे आहे. पण ते ब्रिटिश अधिकारी होते. ख्रिस्ती मिशनरी नव्हेत. उलट ख्रिस्ती मिशनऱ्यांनी भारतीय संस्कृती, परंपरा आणि समाजव्यवस्था यांचा स्वीकार केला. त्यांनी स्वतःला संपूर्ण भारतीय म्हणून तयार केले आणि आपल्या देशासारखेच भारताशी व भारतीय लोकांशी प्रेम केले. त्यामुळे आपण असे म्हणू शकतो की, हे ख्रिस्ती मिशनऱ्यांचे ओझे होते. त्यांनी जात, धर्म, वंश श्रेष्ठत्वात स्वतःला कधीही गुंतवून घेतले नाही. उलट त्यांनी समतेचा पुरस्कार करून समानतेचे तत्त्व जोपासले. त्यामुळे ख्रिस्ती मिशनरीचे ओझे हे खऱ्या अर्थाने सत्यावर आधारलेले होते त्यांचा गोऱ्या म्हणजे ब्रिटिश लोकांचा आर्थिक पिळवणूकीशी काहीही संबंध नव्हता.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी जगाला समता, बंधुत्व आणि समानतेचा अधिकार दिला. त्याचे ओझे हे प्रामाणिक आणि शुद्धतेवर आधारित असून जागतिक राष्ट्राच्या सर्वांगीण हितासाठी कारणीभूत ठरले.

**६.जाती व्यवस्था नष्ट करून सामान्य लोकांनाचर्चमध्ये एका स्थानावर आणले :**

निग्रो, आदिवासी, दलित इत्यादी समाजघटक संपूर्ण विश्वात आपल्या हक्कासाठी गेल्या कित्येक शतकापासून लढत होता. आफ्रिकेत नेल्सन मंडेला तर भारतात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या एकेरी कर्तृत्वाने सामान्य लोकांना समानतेचा आणि स्वातंत्र्याचा अधिकार प्राप्त करून दिला. पण त्याही अगोदर सतराव्या शतकापासून ख्रिस्ती मिशनऱ्यांनी या लोकांना ख्रिस्ताच्या प्रचारातून समानतेचा आणि समतेचा अधिकार प्राप्त करून देण्यास मदत केली. आरोग्य, शिक्षण या घटकांच्या माध्यमातून त्यांना शिक्षित करून त्यांना समाजात उच्चस्थानावर नेण्याचा पूर्ण प्रयत्न केला. चर्चमध्ये प्रत्येक जाती, धर्माचे, वंशाचे लोक एकत्र वावरू लागले आणि जातीव्यवस्था नष्ट करण्याचा सफलतापूर्वक प्रयत्न केला. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी फक्त ख्रिस्ती धर्माचा प्रचार व प्रसारच केला नाही, तर सामान्य आणि पीडित लोकांना जीवन जगण्याची कला शिकवीली.

**संदर्भसूची:-**


1. लेखकाची व्याख्या
2. मत्तयकृतशुभवर्तमान, अध्याय २८, वचन १९-२०, पवित्रशास्त्र.
3. मत्तयकृतशुभवर्तमान, अध्याय ११, वचन ४-११, पवित्रशास्त्र.
4. दृष्टांतधारी विश्वास,कर्ट जुगेनसर मेयर, महानेट प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृ.क्र. १५.
5. खरे शिष्यत्व, विल्यम मकडोनाल्ड, ओथेन्टीक पब्लिकेशन, हैद्राबाद, प्रथमावृत्ती, पृ.क्र. २०-२१.
6. उपरोक्त, खरे शिष्यत्व, विल्यम मकडोनाल्ड, पृ.क्र. २२.
7. पूर्वोक्त, मिशनरीच्या पाउलखुणा, विश्वास वळवी, पृ.क्र. २६.
8. इफीसकरास पत्र, अध्याय ११, वचन ३२, पवित्रशास्त्र